नि.फौ.ख.नं.२०८/२०१९

निशाणी क्र.२४

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,

**माझे नाव – सुषमा बाळू सावंत ,**

वय - ३६ वर्षे, व्यवसाय – दुकान,

रा. वालचंदनगर. ता.इंदापूर, जि.पुणे.

**सरतपास सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री.एस.एस.भांडारकर यांच्यामार्फत शपथेवर सुरु -**

**१.** घटना दि.२१/०४/२०१९ रोजी सकाळी ११ वाजता अकोले गावात ग्रामपंचायत समोर घडली. आमचे घड्याळ व गॉगलचे दुकान आम्ही बाजारात व यात्रेत लावतो. २१ तारखेला अकोल्यात यात्रा असल्याने आम्ही आमचे दुकान तेथे लावले होते. त्या दिवशी एक माणूस आमच्या दुकानात आला. (साक्षीदाराने तो माणूस म्हणजेच आरोपी असल्याचे न्यायालय कक्षात मागे बसलेल्या आरोपीकडे बोट करुन सांगितले). त्याने "घड्याळ कितीला आहे" असे माझ्या पतीला विचारले. माझे पती म्हणाले "एक घड्याळ ३० रुपयाला आहे व तीन घड्याळे घेतली तर त्याचे ९० रुपये होतात.” त्यावेळी आरोपी म्हटला "मी ६० रुपये देणार” त्यावर माझे पती म्हटले "मला ६० रुपयाला देणे परवडत नाही”. त्यावेळी आरोपी म्हणाला "तु माझ्या गावात दुकान घेऊन आला आहेस, तर तुला ६० रुपयाला घड्याळ द्यावेच लागेल”. मी त्यावेळी आरोपीला म्हणाले "तु माझ्या पतीला आरे-तुरे करु नको, तुला घ्यायचे असेल तर घे” त्यावर आरोपीने मला शिवीगाळ करायला सुरुवात केली. त्यावेळी शेजारच्या दुकानातील लोकांनी येऊन "तु भांडण करु नको" असे म्हणून आरोपीला माघारी पाठवून दिले.

**२.** आरोपी घरी गेला व १५-२० मिनीटांनी बांबूची काठी घेऊन आला. त्याने माझ्या डोक्यात व डाव्या खांद्यावर काठीने मारहाण केली. त्याने दुकानावर काठीने मारुन घड्याळ व गॉगल फोडून टाकले. आरोपीने माझ्या पतीच्या हातावर व पायावर काठीने मारहाण केली. तेथे गावातील लोक आले व त्यांनी आम्हाला घरी जायला सांगितले. त्यानंतर आम्ही भिगवण पोलिस ठाणेत गेलो.

**३.** पोलिसांनी आम्हाला दवाखान्यात जायला सांगितले म्हणून आम्ही भिगवण सरकारी दवाखान्यात गेलो. दवाखान्यात उपचार घेऊन आम्ही भिगवण पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदविली. मला आता तक्रार दाखविली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे.

तक्रारीला **निशाणी २५** देण्यात येते. मला आता प्रथम खबर अहवाल दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. प्रथम खबर अहवालाला **निशाणी २६** देण्यात येते.

**४.** मला पोलिसांनी दवाखान्यात जाण्याकरिता यादी दिली असुन ती यादी मला आता दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **निशाणी २७** देण्यात येते.

**५.** ज्या बांबूच्या काठीने मला मारहाण झाली ती काठी दाखविल्यास मी ओळखू शकते. (साक्षीदारास जमा मुद्देमाल नं.१८/२२ मधील काठी दाखविली. साक्षीदाराने त्याच काठीने तिला व तिच्या पतीला मारहाण झाल्याचे सांगितले.) काठीला **वस्तु-अ** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री.एस.एच.खाडे यांचेमार्फत शपथेवर सुरु-**

**६.** माझे शिक्षण ८ वी झाले आहे. हे खरे की, बाळू उर्फ बाळासाहेब सावंत हे माझे पती आहेत. हे खरे की, महंमद रमजान पठाण, गोरख रामदास खंडागळे हे आमच्या गावातील व ओळखीचे आहेत. हे खरे की, अकोले गावची लोकसंख्या २ ते ३ हजार आहे. हे खरे की, अकोले गावातील यात्रा ही पंचक्रोशीत प्रसिद्ध यात्रा आहे. हे खरे नाही की, त्या यात्रेसाठी ५ ते ६ हजार लोक येतात. त्या यात्रेसाठी किती लोक येतात मला सांगता येत नाही. हे खरे की, साधारण २ ते ३ हजार लोक यात्रेसाठी येत असतात. यात्रेत गर्दी जास्त असते अगर कसे मी सांगू शकणार नाही. यात्रेच्या उत्तरेस हनुमान मंदिर, दक्षिणेस भगवान बाबा मंदिर आहे अगर कसे मला माहिती नाही. यात्रा भरते तेथे मस्जीद आहे अगर कसे मला माहिती नाही. हे खरे नाही की, कथित यात्रेच्या ठिकाणी ५० ते १०० लोकांची घरे आहेत. यात्रा भरते तेथे गाव वसले आहे अगर कसे मला माहिती नाही. माझ्या म्हणण्यानुसार कथित यात्रेच्या ठिकाणी एकही घर नाही. हे खरे की, कथित यात्रेच्या ठिकाणी ५० ते ६० दुकाने होती.

**७.** यात्रेच्या ठिकाणी दुकान लावण्याकरिता मी ग्रामपंचायतीचा परवाना घेतला होता. हे खरे नाही की, तसा परवाना मी प्रस्तुत खटल्यात दाखल केला नाही. हे खरे की, मी माझ्या दुकानाकरिता पंचायतीचा परवाना अगर त्याचे नोंदणी प्रमाणपत्र घेतले नाही. घटनेच्या वेळी कोणत्या लोकांनी आरोपीस ढकलून दिले त्यांची नावे मला सांगता येणार नाहीत. कथित भांडणाची सोडवासोडव कोणी केली ते मला सांगता येणार नाही. हे खरे की, कथित घटनेवेळी आरोपीचे नाव मला माहित नव्हते. मला कोणत्या लोकांनी आरोपीचे नाव सांगितले त्या लोकांची नावे मला सांगता येणार नाहीत.

**८.** हे खरे की, साधारण गावात दोन राजकीय गट असतात.

९. "तु माझ्या गावात दुकान घेऊन आला आहेस, तर तुला ६० रुपयाला घड्याळ द्यावेच लागेल” तसेच त्यावेळी शेजारच्या दुकानातील लोकांनी येऊन "तु भांडण करु नको" असे म्हणून आरोपीला माघारी पाठवून दिले" तसेच आरोपी घरी गेला व १५-२० मिनीटांनी बांबूची काठी घेऊन आला तसेच माझ्या डाव्या खांद्यावर काठीने मारहाण केली तसेच आरोपीने काठीने मारहाण करुन आमच्या दुकानातील गॉगल व घड्याळ फोडले, तसेच गावातील लोकांनी आम्हाला घरी जायला सांगितले असे मी तक्रार देताना पोलिसांना सांगितले होते. हे खरे की, तसे माझ्या जबाबात नमूद नाही. ते का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

१०. हे खरे की, वस्तु-अ सारख्या काठ्या शेतात मिळतात. वस्तु-अ वरील काठी ५ फुट उंचीची आहे या प्रश्नाला साक्षीदाराने असेल असे उत्तर दिले. हे खरे नाही की, माझ्या सरतपासातील आरोपीने मला व माझ्या पतीला बांबूच्या काठीने मारहाण केल्याचा संपूर्ण मजकूर मी खोटा कथन केला आहे. हे खरे नाही की, यात्रेत झालेल्या गोंधळामुळे आम्हाला दुखापती झाल्या. हे खरे नाही की, राजकीय लोकांच्या व पोलिसांच्या सांगण्यावरुन मी आरोपीविरुद्ध तक्रार केली आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2025.09.25 18:46:39 +0530

**(प्राजक्ता राजीव सबनीस)**

**दि.२५/०९/२०२५**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,**
**ता.इंदापूर, जि.पुणे.**